लोकमत
epaper.lokmat.com
कोल्हापूर, मंगळवार, दि. १५ जून २०२१

### शववाहिकेवर चालक म्हणूनही कार्यरत

# ती करते कोरोनाबाधित मृतदेहांवर अंत्यसंस्कार

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** ती बीएस्सीच्या पहिल्या वर्षात शिकते. कोरोनामुळे सध्या ऑनलाईन अध्यापन सुरू आहे. घरी बसून अभ्यास करीत असतानाच सामाजिक कामाची आवड तिला स्वस्थ बसू देईना. यातूनच तिने थेट शववाहिकेचे स्टेअरिंग हातात घेतले. कोरोनाबाधित मृतदेह उचलून सरण रचण्यापासून पंचगंगा स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यापर्यंतची कामे ती मोठ्या धाडसाने करते. प्रिया प्रकाश पाटील असे त्या युवतीचे नाव आहे. कोरोना संसर्गजन्य आजार असल्याने रक्ताची नाती अंत्यसंस्कारापासून लांब राहत असली तरी प्रियासारखे सामाजिक कार्यकर्ते माणुसकीची नाती घट्ट करण्याचे काम करीत आहेत.

प्रिया येथील जाधववाडीची. ती विवेकानंद कॉलेजमध्ये बी.एस्सीच्या पहिल्या वर्गात शिकते. तिला सामाजिक कामाची आवड आहे. या आवडीतून ती कोरोना महामारीत गरजूंच्या मदतीला धावून जाण्याचा निर्धार केला.




कोल्हापुरातील प्रिया पाटील ही युवती कोरोनाबाधित शववाहिकेतून घेऊन जात पंचगंगा स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यास मदत करते.

> कॉलेजचे शिक्षण घेत असतानाच सामाजिक कामाच्या आवडीतून कोरोनाबाधित शव वाहतूक करणाऱ्या वाहिकेवर काम करण्याचा निर्णय घेतला. चारचाकी वाहन चालवता येत असल्याने शववाहिकेवर चालक म्हणूनही काम करते. पंचगंगा स्मशानभूमीत आतापर्यंत ५० ते ५५ मृतदेहांवर अंत्यसंस्कार केले.
>
> \- प्रिया पाटील

कोरोनाच्या दुसऱ्या लाटेत गरजूंना मदतीसाठी ती सक्रिय झाली. भवानी फाउंडेशन आणि बालाजी कलेक्शनच्या प्रशांत पोफळे यांनी शिवसेनेचे कार्यकर्ते हर्षल सुर्वे, चैतन्य अष्टेकर, राकेश सावंत यांना दिलेल्या शववाहिकेवर ती कार्यरत आहे. सीपीआरसह शहरातील विविध हॉस्पिटलमध्ये कोरोनाने मयत झालेले शव वाहिकेतून आणून पंचगंगा स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यासाठी मदत करते. या कामात तिने झोकून दिले आहे. पुरुषांच्या बरोबरीने ती शववाहिकेवर चालक म्हणून कार्यरत असते. पीपीई किट परिधान करून कोरोनाबाधित शव उचलून वाहिकेत घेते. वाहिकेतून पंचगंगा स्मशानभूमीत घेऊन जात महापालिका कर्मचाऱ्यांच्या मदतीने अंत्यसंस्कार करते. अजूनही स्मशानभूमीत जात महिला, युवती अंत्यसंस्काराचे काम करण्याचे धाडस करीत नाहीत. पण प्रिया स्मशानभूमीत जात कोरोनाबाधीत शवावर अंत्यसंस्कार करते. अनेक नातेवाईक कोरोनामुळे मृतांकडे पाठ फिरवत असताना तिच्या या धाडसाचे कौतुक होत आहे. अनेक महिला स्मशानभूमीत जाण्यास घाबरत असताना ही तरुणी मात्र धाडसाने हे काम करत आहे.

पुढारी
कोल्हापूर, सोमवार, २८ जून २०२१



कोल्हापूर : श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेतर्फे रणरागिणी शववाहिका चालक प्रिया पाटील यांचा सत्कार करताना प्राचार्य अभयकुमार साळुंखे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार.

पुढारी
सोमवार, २८ जून २०२१

लोकमत
epaper.lokmat.com
कोल्हापूर, गुरुवार, दि. ८ जुलै २०२१

# प्रिया पाटील हिचा सत्कार

**कोल्हापूर** : विवेकानंद महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाची (एनएसएस) स्वयंसेविका प्रिया पाटील हिने कोरोना कालखंडामध्ये सेवाभावाचा एक नवा आदर्श निर्माण केला आहे. तिचे मदतकार्य सर्व तरुणाईसाठी कौतुकास्पद आणि प्रेरणादायी आहे, अशा शब्दांत शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांनी गौरव केला.विद्यापीठात बुधवारी सकाळी कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते तिचा ग्रंथ भेट देऊन सत्कार केला. यावेळी अभय जायभाये, विवेकानंद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार उपस्थित होते.

लोकमत

कोल्हापूर, शुक्र

16/07/21

# कोरोना रणरागिणीशी 'विवेकानंद'मध्ये संवाद

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : येथील विवेकानंद महाविद्यालयात कोरोना रणरागिणीशी संवाद हा कार्यक्रम ऑनलाइन पध्दतीने झाला. त्यासाठी शिक्षण तज्ज्ञ डॉ. बी. एम. हिर्डेकर प्रमुख उपस्थित होते. या कार्यक्रमात कोरोना रणरागिणी प्रिया पाटील, आंचल कट्यारे , अर्पिता राऊत, सेजल येलडी यांची ओळख प्रियदर्शिनी व अभिजीत यांनी करून दिली.

कोरोना रणरागिणीची मुलाखत कॉलेज विद्यार्थिनी सानिका, संस्कार आणि आर्या यांनी घेतली. यावेळी प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, अशोक करांडे,समीक्षा फराकटे, सुप्रिया पाटील उपस्थित होते.

7/2021

7/4

Pod 8/10/2021

लोकमत

शुक्रवार, दि. ८ ऑक्टोबर २०२१

कोल्हापूरच्या प्रिया पाटीलचा कोरोना काळात अनोखा सेवाभाव

# 'त्यांच्या' अंत्यसंस्कारासाठी 'ती'ने केले शववाहिकेचे सारथ्य

आम्ही रणरागिणी

संतोष मिठारी.
लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** कोरोनाच्या भीतीने एकमेकांचा स्पर्शही अव्हेरला जात होता. कोरोनाचा संसर्ग झाला म्हणून वाळीत टाकण्याचा विदारक अनुभव अनेकांना येत असताना अशा परिस्थितीमध्ये सामाजिक बांधिलकी काय असते, याची प्रचीती कोल्हापुरातील वीस वर्षीय युवती प्रिया प्रकाश पाटील हिच्या कामगिरीतून आली. शववाहिकेवर चालक म्हणून सेवा देत तिने कोरोनाने मृत्यू पावलेल्या ४५० नागरिकांचे मृतदेह स्मशानभूमीत पोहोचविले. त्यातील बहुतांश मृतदेहांवर अंत्यसंस्कारही तिनेच केले.

जाधववाडी येथे राहणारी प्रिया ही विवेकानंद महाविद्यालयात बी.एस्सी. अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षात शिकत आहे. तिचे वडील खाजगी कारखान्यात काम करतात. वडिलांच्या एका मित्राचा कोरोनाने मृत्यू झाला. त्यांचा मृतदेह अंत्यसंस्कारासाठी नेण्याकरिता सात तासांची प्रतीक्षा करावी लागली. त्यावर प्रिया हिने अशा कोरोनाने मृत झालेल्या लोकांचे मृतदेह स्मशानभूमीपर्यंत पोहोचविण्यासाठी योगदान देण्याचे ठरविले. त्यासाठी तिला वडिलांनी शिकविलेल्या चारचाकी चालविण्याच्या कौशल्याचा उपयोग झाला. भवानी फाउंडेशनच्या माध्यमातून तिने जून ते ऑगस्ट असे तीन महिने सेवा दिली. कोरोनाबाधितांना रुग्णालयात दाखल करण्यापासून ते त्यांच्या कुटुंबाला आधार देण्यापर्यंत आणि कोरोनाग्रस्तांच्या मृत्यूनंतर मृतदेहाला शववाहिकेतून स्मशानभूमीपर्यंत नेऊन प्रसंगी अंत्यसंस्कार करण्याचे काम तिने केले. यातून तिने अनेकांचा दुवा घेतला.

तिच्या या सेवाभावी कार्याची दखल घेत सतेज पाटील, भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील, शिवाजी विद्यापीठ, विवेकानंद कॉलेज, रोटरी क्लबने तिचा सत्कार केला. लोकराजा छत्रपती राजर्षी शाहू महाराज प्रतिष्ठानने तिला रणरागिणी पुरस्कार जाहीर केला आहे.






कोविड काळात सतत पीपीई किट परिधान केलेली प्रिती पाटील

## करून दाखविले

कोरोना काळात ही मुलगी काय सेवा देणार, असे अनेकांना वाटले. मात्र, सामाजिक बांधिलकी जपण्याच्या उद्देशाने शववाहिकेवर चालक म्हणून सेवा देत मी अशक्य ते शक्य करून दाखविले. त्यासाठी मला आई-वडील, भाऊ पवन पाटील, भवानी फाउंडेशनचे अध्यक्ष हर्षेल सुर्वे, चैतन्य अष्टेकर, प्रदीप हांडे, राकेश सावंत यांचे पाठबळ, तर सीपीआर, महापालिका आणि जिल्हा प्रशासनाचे सहकार्य लाभले असल्याचे प्रिया हिने सांगितले.

कोणतेही क्षेत्र असू दे त्यामध्ये महिलांनी जिद्दीने कार्यरत राहावे. काहीवेळा टीका होईल; पण त्याकडे दुर्लक्ष करून उत्कृष्ट कामगिरी करावी. चांगल्या कामगिरीची समाज निश्चितपणे दखल घेतो. कोरोनाच्या तिसऱ्या लाटेला दूर ठेवण्यासाठी सर्वांनी आवश्यक ती काळजी घ्यावी.

-प्रिया पाटील

Pod 8/10/2021. PR 8-10-21

10.7.21

दैनिक महासत्ता इचलकरंजी

शनिवार, ता.१० जुलै २०२१

# शिवाजी विद्यापीठातर्फे प्रिया पाटीलचा गौरव

कोल्हापूर,ता.९(प्रतिनिधी)-

प्रिया पाटील हिने कोरोना कालखंडामध्ये सेवाभावाचा एक नवा आदर्श निर्माण केला आहे. तिचे मदतकार्य सर्व तरुणाईसाठी कौतुकास्पद आणि प्रेरणादायी आहे, अशा शब्दांत शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांनी गौरव केला.

शिवाजी विद्यापीठाशी संलग्नित विवेकानंद महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाची स्वयंसेविका असलेली प्रिया पाटील ही सध्या कोल्हापूरमध्ये कोव्हिडमुळे मृत्यू पावलेल्या नागरिकांचे मृतदेह वाहून नेणाऱ्या शववाहिकेवर चालक म्हणून सेवा देत आहे. गेल्या दीड महिन्यांपासून अत्यंत सेवाभावी वृत्तीने ती कोरोना काळात अखंड कार्यरत आहे. कोरोनाबधितांना रुग्णालयात दाखल करण्यापासून ते त्यांच्या कुटुंबाला आधार देण्यापर्यंत तसेच कोरोनाग्रस्तांच्या निधनानंतर मृतदेहाला शववाहिकेतून स्मशानभूमीपर्यंत नेऊन प्रसंगी अंत्यसंस्कार करण्याचे कामही करत आहे. आजपर्यंत २४० हून अधिक मृतदेह वाहून नेऊन त्यांच्यावर तिने अंत्यसंस्कार केले आहेत.

प्रिया पाटील हिच्या या कार्याबद्दल शिवाजी विद्यापीठात आज सकाळी कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांच्या हस्ते तिचा ग्रंथभेट देऊन सत्कार केला. यावेळी अभय जायभाये, विवेकानंद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर.आर.कुंभार,डॉ.एच बी. पाटील, प्रा. संदीप पाटील, अधीक्षक चंद्रशेखर दोडमणी उपस्थित होते.

पुण्य नगरी • कोल्हापूर
सोमवार, २५ जानेवारी २०२१

# दीड टन कचरा उठाव

## महास्वच्छता अभियानात सेवाभावी संस्थांसह जनतेचा सहभाग

कोल्हापूर : प्रतिनिधी

शहरामध्ये रविवारी झालेल्या महास्वच्छता अभियानामध्ये दीड टन कचरा व प्लास्टिक गोळा करण्यात आले. या मोहिमेचा ९१ वा रविवार असून यामध्ये उपआयुक्त निखिल मोरे, सहा. आयुक्त संदीप घार्गे, आरोग्याधिकारी डॉ. अशोक पोळ, स्वरा फाऊंडेशनचे अध्यक्ष प्रमोद माजगावकर व कार्यकर्ते, स्वच्छतादूत अमित देशपांडे, विवेकानंद कॉलेजचे आदित्य लातूरकर व विद्यार्थी, स्वच्छतादूत अमित देशपांडे, महापालिकेचे अधिकारी व सफाई कर्मचारी यांनी सोशल डिस्टंन्स ठेवून स्वच्छता मोहिमेत सहभाग नोंदविला. ही मोहीम महापालिका प्रशासक डॉ. कादंबरी बलकवडे यांच्या मार्गदर्शनाखाली झाली.



कोल्हापूर : महास्वच्छता अभियानात सहभागी मनपा कर्मचारी व नागरिक.

शिये नाका मेनरोड, तांबट कमान संपूर्ण परिसर, संभाजीनगर बस स्टॅण्ड ते तलवार चौक, हॉकी स्टेडिअम ते भक्तीपूजानगर चौक, बिंदू चौक ते दसरा चौक, पंचगंगा घाट परिसर, सायबर चौक ते शिवाजी विद्यापीठ परिसर येथे करण्यात आली. स्वरा फाऊंडेशनच्या वतीने जयंती पम्पिंग स्टेशन येथे स्वछता करून वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी शाखा अभियंता आर. के. पाटील, स्वरा फाऊंडेशनच्या महिला जिल्हाध्यक्ष सविता पाडळकर, उपाध्यक्ष पियूष हुलस्वार, फैजान देसाई, यश रुकडीकर, मुकुंद कांबळे, मानसी कांबळे, काका पडळकर, शेखर वडणगेकर व सदस्य उपस्थित होते.

वृक्षप्रेमी संस्थेकडून टाकाळा, माळी कॉलनी येथील महापालिकेच्या उद्यानामध्ये स्वच्छता मोहीम करून प्रजासत्ताक दिनादिवशी वृक्षारोपणासाठी खड्डे काढण्यात आले. यावेळी वृक्षप्रेमी संस्थेचे अध्यक्ष अमोल बुद्धे, भालचंद्र गोखले, उदयसिंह जाधव, सतीश कोरडे, अक्षय कांबळे, विद्या पाथरे, सविता साळुंखे, लव बकरे, रोहन बेविन कट्टी, साजिद शेख, अनुज वागरे, सचिन पवार, शैलेश पोवार, तात्या गोवावाला आदी सदस्य उपस्थित होते. या स्वच्छता मोहिमेत ३ जेसीबी, ६ डंपर, २ आरसी गाड्या, ३ औषध फवारणी व २ पाणी टँकरचा वापर करण्यात आला; तसेच सदरची मोहीम महापालिकेच्या १५० स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या सहाय्याने राबविण्यात आली.

यावेळी संभाजी मगदूम, सर्जेराव आळवेकर, कोंडिबा गावडे, मुख्य आरोग्य निरीक्षक जयवंत पवार, विभागीय आरोग्य निरीक्षक राहुल राजगोळकर, निखिल पाडळकर, माहिती शिक्षण व संवाद अधिकारी नीलेश पोतदार, आरोग्य निरीक्षक सुशांत कावडे, नंदकुमार पाटील, श्रीराज होळकर, सुशांत शेवाळे, मुनीर फरास, करण लाटवडे, शिवाजी शिंदे आदी उपस्थित होते.

पुण्य नगरी

शनिवार, १२ जून २०२१ । कोल्हापूर

# कोरोनामुक्तीसाठी हवी युवक, ग्रामस्थांची एकजूट

## प्रा. डॉ. संजय ठिगळे : माझा गाव कोरोनामुक्त गाव अभियानास प्रारंभ

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

कोरोनाच्या महामारीमुळे मानवाच्या अस्तित्वाला धोका निर्माण झाला आहे. भारतात खेडोपाडी या विषाणूचा संसर्ग झपाट्याने वाढत असून, तो रोखण्यासाठी युवक व ग्रामस्थांनी एकजूट दाखवली पाहिजे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे माजी समन्वयक प्रा. डॉ. संजय ठिगळे यांनी केले. विवेकानंद कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने आयोजित माझा गाव कोरोनामुक्त गाव या अभियानाच्या ऑनलाईन उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

ठिगळे म्हणाले, कोरोनामुळे जगाची अर्थव्यवस्था पूर्णपणे कोलमडली आहे. प्रगत मानलेल्या अमेरिका व युरोपमधील देशांमध्ये मोठी मनुष्यहानी झाली आहे. भारतात स्थिती गंभीर होत चालली आहे. या बाबीचे गांभीर्य लक्षात घेऊन शिवाजी विद्यापीठाने प्रत्येक महाविद्यालयातून माझा गाव कोरोनामुक्त गाव अभियान राबवण्याचा संकल्प केला. त्याचाच एक भाग म्हणून प्रत्येक महाविद्यालयाने किमान पाच गावे दत्तक घेऊन ती कोरोनामुक्त करावीत, अशी अपेक्षा केली आहे. त्यानुसार विवेकानंद कॉलेजने वसगडे, वळिवडे, उचगाव, चिंचवाड, गडमुडशिंगी अशी पाच गावे दत्तक घेतली आहेत. हे ध्येय साध्य करण्यासाठी व संपूर्ण कोरोनामुक्तीसाठी युवक व ग्रामस्थांची एकजूट हवी. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी प्रोत्साहनपर मार्गदर्शन केले. कार्यक्रम अधिकारी प्रा. एच. पी. पाटील यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. आभार प्रा. पी. आर. बागडे यांनी मानले. सूत्रसंचालन प्रा. संदीप पाटील यांनी केले.

यावेळी वसगडे गावचे सरपंच नेमगोंडा पाटील, वळिवडेचे सरपंच अनिल पंढरे व उचगावचे गणेश काळे, चिंचवाडचे सुदर्शन उपाध्ये, गडमुडशिंगीच्या अश्विनी शिरगावे, डॉ. सरिता शिंदे, स्वयंसेवक अभिषेक पोतदार, अपूर्वा खांडेकर, प्रणव कागले उपस्थित होते.

पुण्य नगरी

मंगळवार, २२ जून २०२१

## विवेकांनद महाविद्यालय

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

विवेकानंद महाविद्यालयात ७ व्या आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त योगा प्रशिक्षणाचे आयोजन केले होते. 'योगा फोर वेल बीईंग' मथळ्याखाली योग दिन साजरा करण्यात आला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी योग शिबिराचे उद्घाटन केले. प्रमुख अतिथी मेजर गुगा मालती यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. योग साधक प्रा. डॉ. मिलिंद कारंजकर आणि योगगुरू आशा पाटील यांनी एनसीसी छात्रांना व एनएसएस स्वयंसेवकांना योगासनाचे धडे दिले. प्रास्ताविक तेजश्री मागावकर आणि आभार सिद्धार्थ पाटील यांनी मानले. कार्यक्रमाचे नियोजन कॅप्टन सुनीता भोसले, लेफ्टनंट जितेंद्र भरमगोंडा, प्रा. एच. पी. पाटील, प्रा. राजश्री पाटील, प्रा. डी. एम. पन्हाळकर आणि आर्या जोशी यांनी केले.

पुण्यनगरी

SMART कोल्हापूर | रविवार, ११ जुलै २०२१

# In Short

## 'विवेकानंद'मध्ये कोरोना रणरागिणींशी संवाद

**कोल्हापूर :** विवेकानंद कॉलेजमध्ये कोरोना रणरागिणींशी संवाद हा कार्यक्रम ऑनलाईन पद्धतीने झाला. प्रमुख पाहुणे शिक्षणतज्ज्ञ डॉ. बी. एम. हिर्डेकर हे होते. या कार्यक्रमात कोरोना रणरागिणी प्रिया पाटील, आंचल कट्यारे, अर्पिता राऊत, सेजल येलडी यांची ओळख प्रियदर्शिनी व अभिजित यांनी करून दिली. कोरोना रणरागिणींची मुलाखत कॉलेज विद्यार्थिनी सानिका, संस्कार आणि आर्या यांनी घेतली. या मुलाखतीतून त्यांना आलेले अनुभव, त्यांची कार्यप्रणाली, त्यांचे अभ्यासाचे आणि समाजकार्याचे नियोजन, शिकायला मिळालेल्या गोष्टी यांची सविस्तर माहिती मिळाली. स्वागत व प्रास्ताविक अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष समन्वयक डॉ. श्रुती जोशी यांनी केले. आभार विद्यार्थी विकास कक्ष समनवयक डॉ. कविता तिवडे यांनी मानले. सूत्रसंचालन तेजस गुरव यांनी केले. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, प्राचार्य डॉ. अशोक करांडे, प्रा. समीक्षा फराकटे, प्रा. सुप्रिया पाटील उपस्थित होते.

पुण्य नगरी

शनिवार, ३० ऑक्टोबर २०२१

# विवेकानंद कॉलेजमध्ये महालसीकरण शिबिर



**कोल्हापूर :** येथील विवेकानंद कॉलेज व महापालिकेच्या वतीने 'संकल्प विद्यार्थ्यांचा.. कोरोना विरुद्ध लढाईचा' या अंतर्गत शंभर टक्के लसीकरणासाठी महाशिबिर घेण्यात आले. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या नेतृत्वाखाली एन. एस. एस. विभागाच्या वतीने वर्गशिक्षक व विद्यार्थ्यांच्या संपर्कातील व्यक्ती, नातेवाईक, मित्र परिवारामधील १८ वर्षांवरील नागरिकांचे लसीकरण करण्यात आले. एकूण ६४ लोकांना लस देण्यात आली. महापालिकेचे नोडल अधिकारी श्रावण कोकितकर, प्रा. भिकाजी लाड, प्रा. एच. पी. पाटील, प्रा. एम. ए. कुरणे, प्रा. एस. एस. कुंडले, प्रा. राठोड, प्रा. पी. आर. बागडे, प्रा. एस. टी. शिंदे, संजय पोवार आदी प्राध्यापकांनी शिबिराचे यशस्वी नियोजन केले. शिबिरासाठी आयुक्त कादंबरी बलकवडे व उपआयुक्त रविकांत आडसूळ यांचे मार्गदर्शन लाभले.

# शववाहिकेची सारथी 'दुर्गा'

## प्रिया पाटीलच्या धाडसाचे सर्वदूर कौतुक




**कोल्हापूर : गौरव डोंगरे**

कोरोनाने मृत्यू म्हणजे चार हात लांब... कोरोनाबाधिताचा मृतदेह उचलण्यासाठी सहसा कोणी धजावत नाही... मृतदेहावर अंत्यसंस्काराला नातेवाईकही दुरापास्त... अशावेळी जाधववाडीतील दुर्गेने पुढाकार घेऊन शववाहिका चालक बनण्याचा निर्णय घेतला. पाहता पाहता ४५० मृतदेहांवर अंत्यसंस्काराची कामगिरी जिने पार पाडली तिचे नाव प्रिया प्रकाश पाटील.

सर्वसामान्य कुटुंबात जन्मलेल्या प्रियाला वडिलांकडून समाजकार्याचा वसा मिळाला. तिचे वडील शिरोली एमआयडीसीतील एका कंपनीत नोकरीला आहेत. आई मनीषा गृहिणी, मोठा भाऊ पवन सिव्हिल इंजिनिअर असून प्रिया विवेकानंद कॉलेजमध्ये विज्ञान शाखेच्या पहिल्या वर्गात शिकत आहे.

**'त्या' प्रसंगाने व्यथित...**

प्रियाच्या वडिलांच्या एका मित्राचा कोरोनाने मृत्यू झाला. दुपारी साडेचार वाजता मृत्यू होऊनही मृतदेहावर अंत्यसंस्कार होण्यास मध्यरात्र उलटली. शववाहिका वेळेत न मिळणे, स्मशानभूमीतील वेटिंग, कर्मचाऱ्यांची कमतरता अशी कारणे प्रियाच्याही कानावर आली. चारचाकी चालविण्याचा परवाना असणाऱ्या प्रियाने स्वत: शववाहिकेवर चालक म्हणून जाण्याचे ठरवले.

**संधीचा शोध...**

प्रियाकडे चारचाकीचा परवाना होता. तिने शववाहिकेवर चालक म्हणून कामाची संधी मिळण्यासाठी महापालिकेकडे अर्जही सादर केले होते. पण, तिला प्रतिसाद मिळाला नाही. भवानी फाऊंडेशनचे हर्षल सुर्वे यांनी कोरोना मृतांसाठी मोफत शववाहिका देण्याचा निर्णय घेतल्याची माहिती मिळताच प्रियाने त्यांच्याशी संपर्क साधून ही सुरुवात केली.


प्रियाच्या या कामात आई, वडील, भाऊ, नातेवाईक, मित्र परिवाराकडून प्रोत्साहन मिळत आहे. भवानी फाऊंडेशनचे हर्षल सुर्वे, चैतन्य अष्टेकर, प्रदीप हांडे, राकेश सावंत या सहकाऱ्यांचेही मार्गदर्शन मिळत असल्याचे प्रिया आवर्जून सांगते.

### मन विचलित करणारा प्रसंग...

शववाहिकेवर चालक व्हायचे ठरवून प्रिया फिल्डवर आलीही. सीपीआर रुग्णालयात आल्यानंतर पहिल्यांदाच मृतदेह उचलताना ती थोडी विचलित झाली, घाबरली; पण धाडसाने तिने हे काम केले. मृतदेह पंचगंगा स्मशानभूमीत नेऊन त्यावर अंत्यसंस्काराचे सोपस्कार पार पडल्यानंतर प्रियाला स्वत:च्या कामाचा अभिमानही वाटला.

पुढारी

कोल्हापूर, सोमवार, २८ जून २०२१



कोल्हापूर : श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेतर्फे रणरागिणी शववाहिका चालक प्रिया पाटील यांचा सत्कार करताना प्राचार्य अभयकुमार साळुंखे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार.

बुधवार, ७ जुलै २०२१

# विवेकानंद महाविद्यालयातर्फे उद्या कोरोना रणरागिणींशी ऑनलाईन संवाद कार्यक्रम

**कोल्हापूर (पुढारी वृत्तसेवा) :** श्री स्वामी विवेकानंद संस्था संचलित विवेकानंद कॉलेज विद्यार्थी विकास कक्ष आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्या वतीने गुरुवारी (दि. ८) 'संवाद - विवेकानंद कॉलेजच्या कोरोना रणरागिणींशी' या विशेष ऑनलाईन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. प्रमुख पाहुणे ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ. बी. एम. हिर्डेकर यांची उपस्थिती असणार आहे. याप्रसंगी शववाहिका चालक प्रिया पाटील, अर्पिता राऊत, आंचल कटयारे, सेजल येलडी यांच्याशी ऑनलाईन संवाद साधण्यात येणार आहे. कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी केले आहे. १

शहर-जिल्हा पुढारी ५

कोल्हापूर, गुरुवार, ८ जुलै २०२१

## संक्षिप्त



कोल्हापूर : प्रिया पाटील हिचा ग्रंथभेट देऊन सत्कार करताना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत अभय जायभाये, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, डॉ. एच. बी. पाटील, प्रा. संदीप पाटील, चंद्रशेखर दोडमणी. (छाया : पप्पू अत्तार)

# विद्यापीठातर्फे प्रिया पाटीलचा सत्कार

**कोल्हापूर :** कोरोना काळात प्रिया पाटील हिने सेवाभावाचा एक नवा आदर्श निर्माण केला आहे. तिचे मदतकार्य सर्व तरुणाईसाठी कौतुकास्पद आणि प्रेरणादायी आहे, अशा शब्दांत शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी पाटील हिचा गौरव केला. प्रिया विवेकानंद महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेची स्वयंसेविका असून सध्या शववाहिकेवर चालक म्हणून सेवा देत आहे. बुधवारी कुलगुरू शिर्के यांच्या हस्ते प्रिया हिचा ग्रंथभेट देऊन सत्कार केला. यावेळी राष्ट्रीयं सेवा योजना कक्षाचे संचालक अभय जायभाये, विवेकानंद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, कार्यक्रम अधिकारी डॉ. एच. बी. पाटील, कार्यक्रम अधिकारी प्रा. संदीप पाटील, अधीक्षक चंद्रशेखर दोडमणी उपस्थित होते.

पुढारी
शनिवार, १० जुलै २०२१

# 'विवेकानंद' मध्ये कोरोना रणरागिणींशी संवाद

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

विवेकानंद महाविद्यालयामध्ये 'कोरोना रणरागिणींशी संवाद' कार्यक्रम ऑनलाईन पद्धतीने झाला. प्रमुख पाहुणे शिक्षण तज्ज्ञ डॉ. बी. एम. हिर्डेकर यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले.

कोरोना रणरागिणी प्रिया पाटील, आंचल कट्यारे, अर्पिता राऊत, सेजल येलडी यांची मुलाखत विद्यार्थिनींनी घेतली. मुलाखतीतून त्यांनी आलेले अनुभव, त्यांची कार्यप्रणाली, शिकायला मिळालेल्या गोष्टी यांची माहिती दिली. यातून मुलींची जिद्द, चिकाटी व समाजाप्रती असलेली कणव व त्यांच्यातील माणुसकीचे दर्शन घडले. प्रास्ताविक अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष समन्वयक डॉ. श्रुती जोशी यांनी केले. विद्यार्थी विकास कक्ष समन्वयक डॉ. कविता तिवडे यांनी आभार मानले. सूत्रसंचालन तेजस गुरव यांनी केले. यावेळी प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, प्राचार्य डॉ. अशोक करांडे, प्रा. समीक्षा फराकटे, प्रा. सुप्रिया पाटील उपस्थित होते. P

दै. पुढारी : दि. 26.09.2021

# 'विवेकानंद'मध्ये मोफत लसीकरण शिबिराचे आयोजन

**कोल्हापूर पुढारी वृत्तसेवा**

विवेकानंद कॉलेजच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष, एन. एस. एस. व एन. सी. सी. विभाग व महापालिकेतर्फे मंगळवार दि. २८ रोजी सकाळी ९ ते दुपारी ३ या वेळेत अठरा वर्षावरील विद्यार्थी व नागरिकांसाठी मोफत कोरोना कोव्हिशिल्ड लसीकरण शिबिराचे आयोजन केले आहे.

ज्यांनी कोव्हिशल्डची पहिली लस घेऊन ८४ दिवस पूर्ण झालेले आहेत, त्यांना दुसरी लस देण्याची सोयदेखील उपलब्ध आहे. लसीकरणासाठी ऑनलाईन नोंदणी करण्याची गरज नाही. ऑन द स्पॉट नोंदणीची सुविधा उपलब्ध आहे. लसीकरणासाठी येताना सोबत ओळखपत्र (आधार कार्ड/पॅन कार्ड) व मोबाईल आणावा, असे आवाहन विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी केले आहे.

०१ २३/९/२०२१

?? ?.९.२१.

पुढारी

सोमवार, २७ सप्टेंबर २०२१

# 'विवेकानंद'मध्ये उद्या मोफत लसीकरण

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

विवेकानंद कॉलेजच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष, एन.एस.एस. व एन.सी.सी. विभाग व महानगरपालिकेतर्फे मंगळवार (दि.२८) रोजी सकाळी ९ ते दुपारी ३ या वेळेत १८ वर्षांवरील विद्यार्थी व नागरिकांसाठी मोफत कोरोना कोव्हिशिल्ड लसीकरण शिबिर घेण्यात येणार आहे.

ज्यांनी कोव्हिशिल्डची पहिली लस घेऊन ८४ दिवस पूर्ण झालेले आहेत, त्यांना दुसरी लस देण्याची सोय देखील उपलब्ध आहे. लसीकरणासाठी ऑनलाईन नोंदणी करण्याची गरज नाही. ऑन दी स्पॉट नोंदणीची सुविधा उपलब्ध आहे. लसीकरणासाठी येताना सोबत ओळखपत्र (आधारकार्ड, पॅनकार्ड) व मोबाईल आणावा, असे आवाहन प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी केले आहे.

सकाळ कोल्हापूर, सोमवार, २५ जानेवारी २०२१

# महास्वच्छतेत दीड टन कचरा जमा

कोल्हापूर, ता. २४ : शहरात आज झालेल्या महास्वच्छता अभियानात दीड टन कचरा जमा झाला. आजच्या मोहिमेचा ९१ वा रविवार होता. उपायुक्त निखिल मोरे, सहायक आयुक्त संदीप घार्गे, आरोग्याधिकारी डॉ. अशोक पोळ, स्वरा फाउंडेशनचे अध्यक्ष प्रमोद माजगावकर, स्वच्छतादूत अमित देशपांडे, विवेकानंद महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे आदित्य लातूरकर, विद्यार्थी, महापालिकेचे अधिकारी व सफाई कर्मचारी यांनी सहभाग घेतला. प्रशासक डॉ. कादंबरी बलकवडे यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम झाली.

शिये नाका, मेन रोड, तांबट कमान परिसर, संभाजीनगर बसथांबा ते तलवार चौक, हॉकी स्टेडिअम ते भक्तीपूजानगर चौक, बिंदू चौक ते दसरा चौक, पंचगंगा घाट परिसर, सायबर चौक ते शिवाजी विद्यापीठ परिसर येथे स्वच्छता करण्यात आली. स्वरा फाउंडेशनतर्फे जयंती पंपिंग स्टेशन येथे स्वच्छता करून वृक्षारोपण करण्यात आले. या वेळी शाखा अभियंता आर. के. पाटील, सविता पाडळकर, पीयूष हुलस्वार, फैजान देसाई, यश रुकडीकर, मुकुंद कांबळे, मानसी कांबळे, काका पडळकर, शेखर वडणगेकर उपस्थित होते.

वृक्षप्रेमी संस्थेकडून टाकाळा, माळी कॉलनी येथील उद्यानात स्वच्छता करण्यात आली. प्रजासत्ताकदिनी वृक्षारोपणासाठी खड्डे काढण्यात आले.

या वेळी वृक्षप्रेमी संस्थेचे अध्यक्ष अमोल बुड्ढे, भालचंद्र गोखले, उदयसिंह जाधव, सतीश कोरडे, अक्षय कांबळे, विद्या पाथरे, सविता साळुंखे, लव बकरे, रोहन बेविन कट्टी, साजिद शेख, अनुज वागरे, सचिन पवार, शैलेश पोवार, तात्या गोवावाला आदी उपस्थित होते.

या वेळी संभाजी मगदूम, सर्जेराव आळवेकर, कोंडिबा गावडे, मुख्य आरोग्य निरीक्षक जयवंत पवार, विभागीय आरोग्य निरीक्षक राहुल राजगोळकर, निखिल पाडळकर, नीलेश पोतदार, सुशांत कावडे, नंदकुमार पाटील, श्रीराज होळकर, सुशांत शेवाळे, मुनीर फरास, करण लाटवडे, शिवाजी शिंदे आदी उपस्थित होते.



कसब बावडा : येथील शिये रस्त्यावर स्वच्छता करताना नागरिक.

## महापालिकेचे उद्या कत्तलखाने बंद

कोल्हापूर : प्रजासत्ताकदिनानिमित्त मंगळवारी (ता. २६) महापालिका क्षेत्रातील सर्व कत्तलखाने बंद ठेवण्यात येणार आहेत. शहरातील सर्व मटण, मांस व चिकन विक्रेत्यांनी यांची नोंद घेऊन दुकाने बंद ठेवावीत, असे आवाहन महापालिकेच्या आरोग्य विभागाने केले आहे.

5

PR
1/2021

सकाळ » TODAY
कोल्हापूर, गुरुवार, ८ जुलै २०२१ ४



उजळाईवाडी : प्रिया पाटीलचा ग्रंथ भेट देऊन सत्कार करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. शेजारी अभय जायभाये, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, डॉ. एच. बी. पाटील, प्रा. संदीप पाटील, चंद्रशेखर दोडमणी.

# प्रिया पाटील हिचा शिवाजी विद्यापीठातर्फे गौरव

उजळाईवाडी, ता. ७ : "कोरोना काळात प्रिया पाटीलने सेवाभावाचा आदर्श निर्माण केला. तिचे मदतकार्य कौतुकास्पद आहे," अशा शब्दांत शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी तिचा गौरव केला.

विवेकानंद महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाची स्वयंसेविका असलेली प्रिया कोल्हापूरमध्ये कोविड-१९ मुळे मृत्यू पावलेल्या नागरिकांचे मृतदेह नेणाऱ्या शववाहिकेवर चालक म्हणून सेवा देते. दीड महिन्यापासून सेवाभावी वृत्तीने ती कार्यरत आहे. कोरोनाबाधितांना रुग्णालयात दाखल करण्यापासून ते त्यांच्या कुटुंबाला आधार देत कोरोनाग्रस्ताच्या निधनानंतर मृतदेहाला शववाहिकेतून स्मशानभूमीपर्यंत नेऊन प्रसंगी अंत्यसंस्कार करण्याचे कामही करते. आजपर्यंत २४० हून अधिक मृतदेह वाहून नेऊन तिने अंत्यसंस्कार केले आहेत. प्रियाला डॉ. शिर्के यांच्या हस्ते ग्रंथ भेट देऊन तिचा सत्कार केला. राष्ट्रीय सेवा योजना कक्षाचे संचालक अभय जायभाये, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, कार्यक्रम अधिकारी डॉ. एच. बी. पाटील, कार्यक्रम अधिकारी प्रा. संदीप पाटील, अधीक्षक चंद्रशेखर दोडमणी उपस्थित होते.

सकाळ

कोल्हापूर, शनिवार, १० जुलै २०२१

# कोरोना रणरागिणीशी 'विवेकानंद'मध्ये संवाद

रमणमळा, ता. ९ : विवेकानंद कॉलेजमध्ये ऑनलाईन माध्यमातून कोरोना रणरागिणीशी संवाद साधला. कोरोनासारख्या कठीण काळात सामाजिक भान जपत कॉलेजच्या विद्यार्थिनींनी केलेल्या कामगिरीची दखल घेत महाविद्यालयातर्फे या उपक्रमाचे आयोजन केले होते. शिक्षणतज्ज्ञ डॉ. बी. एम. हिर्डेकर प्रमुख उपस्थित होते.

या कार्यक्रमात कोरोना रणरागिणी प्रिया पाटील, आंचल कट्यारे, अर्पिता राऊत, सेजल येलडी यांची ओळख प्रियदर्शिनी व अभिजित यांनी करून दिली. कोरोना रणरागिणीची मुलाखत कॉलेज विद्यार्थिनी सानिका, संस्कार आणि आर्या यांनी घेतली. या मुलाखतीतून त्यांना आलेले अनुभव, त्यांची कार्यप्रणाली, त्यांचे अभ्यासाचे आणि समाज कार्याचे नियोजन, शिकायला मिळालेल्या गोष्टी यांची सविस्तर माहिती मिळाली. या कार्यक्रमातून मुलींची जिद्द, चिकाटी व समाजाप्रती असलेली कणव आणि त्यांच्यातील माणुसकीचे दर्शन घडले.

स्वागत व प्रास्ताविक अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष समन्वयक डॉ. श्रुती जोशी यांनी केले. विद्यार्थी विकास कक्ष समन्वयक डॉ. कविता तिवडे यांनी आभार मानले. तेजस गुरव यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, प्राचार्य डॉ. अशोक करांडे, प्रा. समीक्षा फराकटे, प्रा. सुप्रिया पाटील उपस्थित होते.

तरुण भारत गुरुवार, २१ जानेवारी २०२१

# विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेची पुरस्कारात भरारी

कोल्हापूर

महाराष्ट्र शासनाकडून राष्ट्रीय सेवा योजना विभागामध्ये सर्वोत्कृष्ठ कार्य केल्या जाणाऱ्या महाविद्यालय, कार्यक्रम अधिकारी, स्वयंसेवक यांना तीन वर्षांमध्ये केलेल्या कार्याच्या आधारावर मूल्यमापन करून पुरस्कार दिले जातात. यावर्षी शिवाजी विद्यापीठास सर्वोत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी पुरस्कार (स्मृतिचिन्ह व ५००० रुपये) द्वितीय क्रमांक डॉ. धनंजय लोहार, श्रीमंत बाबासाहेब देशमुख कॉलेज, आटपाडी. सर्वोत्कृष्ट महाविद्यालय– (स्मृतिचिन्ह) द्वितीय क्रमांक श्रीमंत बाबासाहेब देशमुख कॉलेज, आटपाडी. सर्वोत्कृष्ट स्वयंसेवक पुरस्कार (स्मृतिचिन्ह व





२०००) तृतीय क्रमांक कु. ऐश्वर्या मोरे– विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर यांना पुरस्कार प्राप्त झाला आहे. याबद्दल कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर तसेच राष्ट्रीय सेवा योजना कक्षाचे संचालक अभय जायभाये यांनी अभिनंदन केले.

**तरुण भारत** ▪ गुरुवार, २८ ऑक्टोबर २०२१

# विवेकानंद कॉलेजमध्ये ६४ युवक-युवतींचे लसीकरण

**कोल्हापूर :** विवेकानंद कॉलेज व महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने १८ वर्षांवरील ६४ युवक आणि युवतींना कोरोना लस देण्यात आली. लसीकरण शिबिर शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे सभागृहात पार पडले. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली हे शिबिर राबवले. विद्यार्थी नातेवाईक, मित्र परिवारांना यांना लस दिली. १०० टक्के क्षमतेने महाविद्यालय सुरू करण्यासाठी ही लसीकरण मोहीम राबवण्यात येत आहे. यावेळी महानगरपालिकेचे नोडल अधिकारी श्रावण कोकीतकर, प्रा. भिकाजी लाड, प्रा. एच. पी. पाटील, प्रा. एम. ए. कुरणे, प्रा. एस. एस. कुंडले यांच्यासह अन्य सहकाऱ्यांनी शिबिराचे यशस्वी नियोजन केले.

by phone
p04
28/10/2021.

28.10.21